# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित नाशिक
## ( महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम )

**स्थापना** :- कंपनी कायदा १९५६ अन्वये दिनांक १५ जानेवारी १९९९

**उदिष्टे** :- राज्यातील आदिवासी सुशिक्षित बेरोजगार, आर्थीकदृष्टया दुर्बल व दारिद्रय रेषेखाली जीवन जगणा-या व्यक्तींना त्यांचे जीवनमान उंचावण्या करिता शबरी महामंडळाच मार्फत विविध कर्ज योजना राबविण्यांत येत आहे.

**कार्यक्षेत्र** :- शबरी महामंडळाचे मुख्य कार्यालय नाशिक या ठिकाणी असुन राज्यामध्ये महामंडळाच्या १२ शाखा कार्यालये आहेत. प्रादेशिक विभाग नंदुरबार अंतर्गत नंदुरबार व यावल येथे शाखा कार्यालय कार्यरत आहे.

**योजना** :- राष्ट्रीय अनुसुचित जमाती वित्त व विकास महामंडळ नवी दिल्ली ( एन.एस.टी.एफ.डी.सी) मार्फत लाभार्थी सहभाग १० टक्के, शबरी महामंडळ हिस्सा १५ टक्के, व एन.एस.टी.एफ.डी.सी. नवी दिल्ली यांचा ७५ टक्के सहभाग असतो. याप्रमाणे कर्जाचे वाटप करण्यात येते. त्याचा महिला सशक्तीकरण योजनांतर्गत ४ टक्के व्याज दराने व इतर योजनासाठी रुपये ००.०७ लाख पर्यत ६ टक्के व रुपये ००.०७ लाखावरील ८ टक्के असा आहे.

**कर्ज वाटप योजना** :- हेवी ट्रक, टेम्पो ट्रक, एकलव्य मिनी ट्रक, ट्रेक्टर ट्राली, ऑटो रिक्षा, झेरॉक्स मशिन, किराणा दुकान, शेळी मेंढी पालन, दुग्ध व्यवसाय, विटा भटटी, भाजीपाला, प्रवासी वाहने, ऑटो वर्क शॉप, मालवाहु रिक्षा, हॉटेल, पिठाची गिरणी, या योजना पात्र लाभार्थीना लाभ देण्यांत येत असून सन १९९४ ते १९९९ पर्यत जुनी योजना , सन २००१ पासुन शबरी महामंडळा मार्फत वरील योजनांच्या माध्यमातुन अनुक्रमे १०० व ५७६ असे एकूण ६७६ लाभार्थीना दिनांक ३१/१०/२००९ अखेर लाभ दिलेला आहे त्याची रक्कम १६४९७४६३० चे वाटप करण्यांत आले आहे.वर्ष निहाय वाटप खालील प्रमाणे ..

| अ.न | वाटप वर्ष | लाभार्थी संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १९९४ ते १९९९ | १०० | १८३०३६७५ |
| २ | २०००.२००१ | ३१ | ९५८५०९७ |
| ३ | २००२.२००३ | १५ | ४५०००० |
| ४ | २००३.२००४ | ६१ | २३९५००० |
| ५ | २००५.२००६ | ७१ | ६१४०००० |
| ६ | २००६.२००७ | १०२ | ४१८१८९८५ |
| ७ | २००७.२००८ | १५३ | ३३२१३५८६ |
| ८ | २००८.२००९ | ८८ | २८७७०८८५ |
| ९ | २००९.२०१० | ५६ | २४२९७४०० |
| एकूण | | ६७७ | १६४९७४६३० |

प्रादेशिक व्यवस्थापक
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.
प्रादेशिक कार्यालय नंदुरबार